## राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यासदौरे

## राज्य पुरस्कृत योजना

## मार्गदर्शक सूचना सन २०१३-१४

**प्रस्तावना -**

गॅट करारादवारे जगात मूक्त अर्थव्यवस्था मान्य करण्यात आली आहे. राज्यातील शेतकऱ्यांचे केवळ उत्पादन व उत्पादकता वाढविणे हे ध्येय यापुढे न राहता उत्पादीत होणाऱ्या शेतीमालाची दर्जात्मक सुधारणा करण्यासाठी  नवीन तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांनी करणे अत्यंत गरजेचे आहे. शेतीशी निगडीत घटकांबाबत जगात वेळोवेळी होत असलेले बदल, विकसीत होत असलेले तंत्रज्ञान हे शेतकऱ्यांपर्यंत त्यांच्या गरजेनुरुप योग्यवेळी पोहोचविणे आणि त्यासाठी आवश्यक सहाय्य व सोयीसुविधा पुरविणे निकडीचे आहे. कृषि विस्तार कार्यक्रमाद्वारे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्याकरीता करावयाच्या विविध उपाययोजनांसाठी कृषि विभागाकडून त्यादृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत.

विविध देशांनी विकसीत केलेले शेतीविषयक तंत्रज्ञान व तेथील शेतकऱ्यांनी त्याचा केलेला अवलंब व त्याद्वारे त्यांच्या उत्पन्नात झालेली वाढ याबाबत त्या त्या देशातील शास्त्रज्ञ, शेतकरी यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा, क्षेत्रिय भेटी तसेच संबंधीत संस्थांना भेटी इ.द्वारे शेतकऱ्यांचे ज्ञान आणि क्षमता उंचावण्याकरीता राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे आयोजित करणे ही योजना राबविण्यास शासन निर्णय क्र.शेविदौ-४२१२/प्र.क्र.१०१/३-अे, दिनांक १८ जुलै, २०१२ नुसार शासनाची प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार सन २०१३-१४ मध्ये राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेरील अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात येत आहे.

राज्यातील विविध पिकांची उत्पादकता, पीक पध्दतीमधील आधुनिक तंत्रज्ञान, कृषि उत्पादनांचे बाजार व्यवस्थापन, निर्यातीच्या संधी, कृषि प्रक्रियेमधील अद्ययावत पध्दती यामध्ये आमुलाग्र बदल आणण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण करणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. राज्यातील योग्य त्या प्रगतशिल शेतकऱ्यांची विविध स्तरावरील समित्यांमार्फत अंतिम निवड करुन परदेशातील आधुनिक कृषि तंत्रज्ञान पाहण्याची संधी त्यांना उपलब्ध करण्यासाठी सदर मार्गदर्शक सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

www.mahaagri.gov.in

सन २०१२-१३ व २०१३-१४ मधील अभ्यास दौऱ्याकरीता निवड करण्यात आलेल्या प्रवासी कंपन्या व देश -

| अ. क्र. | दौऱ्याचे नाव | प्रवाशी कंपनी | एकुण रक्कम | शासन हिस्सा | शेतकऱ्याने द्यावयाचा हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १ | युरोप-१ (१० दिवस) (जर्मनी, हॉलंड, स्वित्झर्लंड व ऑस्ट्रीया) | कॉक्स अँन्ड किंग्ज लि. | १,३०,०००/- | ६५,०००/- | ६५,०००/- |
| २ | युरोप-२ (१० दिवस) (जर्मनी, हॉलंड, फ्रान्स व स्पेन) | कॉक्स अँन्ड किंग्ज लि. ---------------------- अरोहन टुर्स अँन्ड ट्रॅव्हल | १,५५,०००/- | ७७,५००/- | ७७,५००/- |
| ३ | दक्षिण आफ्रीका - केनिया (१० दिवस) | अरोहन टुर्स अँन्ड ट्रॅव्हल | १,५५,०००/- | ७७,५००/- | ७७,५००/- |
| ४ | दक्षिण आशिया खंड ग्रुप १ (१० दिवस) (व्हिएतनाम,मलेशिया,थायलंड) | अरोहन टुर्स अँन्ड ट्रॅव्हल | ९५,०००/- | ४७,५००/- | ४७,५००/- |
| ५ | दक्षिण अमेरिका (१० दिवस)(पेरू, ब्राझिल, चिली) | कॉक्स अँन्ड किंग्ज लि. | २,८९,०००/- | १,००,०००/- | १,८९,०००/- |
| ६ | ऑस्ट्रेलिया, न्युझिलंड, सिंगापूर (१० दिवस) | कॉक्स अँन्ड किंग्ज लि. | २,०५,०००/- | १,००,०००/- | १,०५,०००/- |

टीपः संबंधीत दौऱ्यामध्ये अथवा दरामध्ये बदल झाल्यास त्याप्रमाणे आपणास लेखी स्वरुपात कळविण्यात येईल.

सन २०१२-१३ मध्ये निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे आतापर्यंत दौऱ्यांचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर योजना अधिक परिणामकारकपणे राबविण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारीत मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

**अनुदानाचा तपशील-**

1. शासनाकडून शेतकऱ्यांना अभ्यास दौऱ्याकरीता ५० टक्के किंवा जास्तीत जास्त रु.१.०० लाख (रुपये एक लाख फक्त) यापैकी जे कमी असेल ते अनुदान देय आहे.
2. दौऱ्याची तारीख निश्चित झाल्यानंतर दौऱ्यामध्ये निवड झाल्याबाबतचे पत्र प्राप्त झाल्याशिवाय शेतकऱ्यांनी शासकीय अनुदानाव्यतिरिक्त स्वहिस्सा म्हणून भरावयाची रक्कम दौरा आयोजित करणाऱ्या कंपनीकडे भरणा करण्यात येवू नये.

www.mahaagri.gov.in

3. वरील तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार एकूण खर्चामध्ये विमान प्रवास, निवास व भोजनाचा खर्च, व्हिसाचा खर्च, इत्यादींचा समावेश आहे. यानुसार येणाऱ्या एकूण खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल रु.१.०० लाख पर्यंत अनुदान देय आहे. उर्वरित ५० टक्के रक्कम शेतकऱ्याने दौऱ्यास जाण्यापूर्वी कंपनीकडे भरणा करावी. तत्पुर्वी प्रवासाकरीता भेटीच्या स्थळांचा तपशील, हॉटेलचा तपशील, विमानप्रवासाचा तपशील नाष्टा व जेवणाची सोय इ. बाबत तारीखनिहाय माहिती शेतकऱ्यास देण्यात यावी.
4. शेतकऱ्यांचा स्वहिस्सा (५० टक्के) रकमेसाठी कोणत्याही इतर शासकीय/निमशासकीय योजनेचा लाभ घेता येणार नाही.
5. मागील दौऱ्याच्या अनुभवावरुन विदेशातील प्रवास, निवास, शासकीय व खाजगी भेटी दरम्यान हेतुपूर्वक झालेल्या नुकसानीचा विचार करता दौऱ्यादरम्यान कोणत्याही प्रकारची किरकोळ मोडतोड अथवा आर्थिक नुकसान झाल्यास त्याकरीता सुरक्षा ठेव म्हणून परतावा स्वरुपात रु.१०,०००/- चा डीडी संबंधीत जिल्हयाचे लेखा अधिकारी/जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या नावे काढून खात्यामध्ये जमा करावा. दौरा पूर्ण झाल्यानंतर संबंधीत शेतकऱ्याकडून कोणतीही वसूली नसल्याची खात्री करुन दौऱ्यासोबत असलेल्या शासकीय अधिकाऱ्याने प्रमाणित करुन सोबत प्रपत्र-५ प्रमाणे शेतकऱ्यांना दौरा समाप्त होताना साक्षांकित करुन दोन प्रतिमध्ये द्यावे. शेतकऱ्यांनी सदर प्रमाणपत्राची एक प्रत स्वतः राखावी व एक प्रत संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास सादर करुन सुरक्षा ठेव धनाकर्ष स्वरुपात १५ दिवसाच्या आत परत घ्यावी.

वर नमूद केल्याप्रमाणे याव्यतिरिक्त येणारा इतर बाबींवरील खर्च शेतकऱ्याने स्वतः करावयाचा आहे.

**1) शेतकरी निवडीचे निकष-**

शेतकऱ्याने स्वतःच्या पारपत्रावर असलेल्या नाव आणि पत्त्यासह अर्ज करावा. अभ्यास दौऱ्याकरीता जाणारा लाभार्थी हा स्वतः शेतकरी असावा. स्वतःच्या नावे असलेला ७/१२ व ८-अ उताऱ्याची चालू वर्षातील प्रत सोबत जोडावी. उताऱ्यावर नोंदविलेले क्षेत्र पिकाखालील असावे. शेतकऱ्याने उत्पन्नाचे मुख्य साधन शेती आहे हे स्वसाक्षांकित करावे व तसे संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रमाणित करावे. यानुसार शेतकऱ्याची निवड करताना खाली नमूद केलेल्या बाबींचा प्राधान्याने विचार करावा व तसे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रमाणीत करावे.

अ) कृषि क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबाबत पुरस्कार प्राप्त शेतकऱ्याची प्राधान्याने निवड करण्यात यावी. यामध्ये आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय/राज्य/जिल्हा स्तरावरच्या शासकीय/निमशासकीय अथवा तत्सम पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात यावे.

ब) शेतकरी हा प्रयोगशील असावा व त्याने आपल्या शेतामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन शेती उत्पादन व उत्पन्नामध्ये भरीव वाढ केलेली असावी. कृषि विभागाच्या विविध कार्यक्रमात सहभागी झालेल्या शेतकऱ्यांना प्राधान्याने सहभाग द्यावा.

क) निवड करण्यात येणारा शेतकरी शक्यतो राज्यामध्ये आत्मा तसेच इतर कार्यकमाअंतर्गत स्थापन करण्यात येत असलेल्या गटाचा सदस्य असावा व त्याने गट शेती/समूह शेतीद्वारे आपल्या शेतीचा विकास केलेला असावा.

ड) कृषि व पणन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण उपकमामध्ये शेतकऱ्याने भाग घेतलेला असावा. उदा. बांधावर खते व बियाणे वाटप इ.

इ) शेतकऱ्याने ''उत्पादक ते गाहक'' या संकल्पनेद्वारे उत्पादन, काढणीपश्चात तंत्रज्ञान, मुल्यवर्धन व विकीव्यवस्था याद्वारे मुल्यवर्धीत साखळीमध्ये सहभाग घेतलेला असावा.

फ) शेतकरी स्वतः आत्मा/वसुंधरा/पणनविषयक योजनांअतर्गत गठीत केलेल्या विविध पातळीवरील समित्यांपैकी किमान एका समिती/समुहाचा प्राधान्याने सभासद असावा.

ग) अनुसूचित जाती/जमातीमधील शेतकरी, महिला शेतकरी, कृषि विद्यापिठाच्या पदवी/पदवीकाधारक शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात यावे.

2) शेतकऱ्याचे वय वर्ष २१ ते ६२ या दरम्यान असावे. त्यासाठी पुरावा म्हणून जन्मदाखला किंवा तत्सम प्रमाणपत्र सोबत जोडावे.

3) शेतकरी शासकीय, निमशासकीय संस्थेत नोकरीस नसावा. तसे त्याने स्वतः आणि संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रमाणित करावे व ते प्रमाणपत्र मुळ अर्जास जोडावे.

4) शेतकरी वैध पारपत्रधारक असावा. पुराव्यासाठी पारपत्राची मुदत/वैधता दर्शविणाऱ्या पानाची झेरॉक्स प्रत जोडावी. पारपत्राची मुदत दोरा निघण्यापूर्वी किमान सहा महिने असावी. तसेच यापुर्वी विदेश दौरा केला असल्यास त्याबाबत देण्यात आलेल्या व्हीसा मान्यतेच्या सर्व प्रतींच्या झेरॉक्स प्रती मूळ अर्जासोबत जोडाव्यात.

5) शेतकऱ्याने यापूर्वी शासकीय (केंद्र/राज्य शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत) अर्थसहाय्याने विदेश दौरा केलेला नसावा. तसे त्याने स्वतः आणि संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रतिस्वाक्षरीत (countersigned) करावे व ते प्रमाणपत्र मुळ अर्जासोबत जोडावे.

6) शेतकऱ्यास परदेश अभ्यास दौऱ्यास जाण्यापूर्वी कोणत्याही प्रकारच्या संसर्गजन्य रोगाची लागण झालेली नसावी, तसेच सलग १०-१५ दिवस कालावधीचा परदेश दौरा संबंधित देशामध्ये करण्यास शेतकरी पात्र

www.mahaagri.gov.in

आहे, याबाबतचे तालुका स्तरावरील शासकीय आरोग्य अधिकारी किंवा तत्सम दर्जाचे अधिकाऱ्याचे वै'कीय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

7) परदेश अभ्यास दौऱ्याच्या निवडीकरीता शेतकरी सर्व निकष पूर्ण करीत असल्याबाबत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रमाणीत करावे.

**शेतकऱ्यांनी पाळावयाच्या अटी/शर्ती -**

सदर योजनेअंतर्गत देशाबाहेरील अभ्यास दौऱ्यांमध्ये सहभागी होताना शेतकऱ्यास खालील अटी/शर्तीचे पालन करणे बंधनकारक आहे. तसे हमीपत्र रु.१००/- च्या स्टँप पेपरवर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी संबंधीत शेतकऱ्याकडून घेऊन ते मूळ अर्जासोबत जोडावे.

1) शेतकऱ्याने दौऱ्यास जाण्यापूर्वी शासनाने ठरवून दिलेल्या देश समुहापैकी कोणत्या देशात व कोणत्या विषयावरील अभ्यास करण्याकरीता जायचे आहे, याबाबत विहीत प्रपत्रातील अर्जात माहिती भरणे आवश्यक आहे. तथापी कोणत्या देशात शेतकऱ्ंाना पाठवावयाचे याचे अधिकार आयुक्त स्तरावरील समितला राहील.

2) शेतकऱ्याच्या दुर्वर्तनामुळे परदेशातील एखाद्या देशामार्फत काही कायदेशीर कारवाई (यामध्ये व्हीसा रद्द होणे किंवा विदेश दौऱ्यास बंदी करणे) अथवा दंडात्मक कारवाई झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी शेतकऱ्याची स्वतःची राहील. दंड म्हणून होणारा सर्व खर्च शेतकऱ्याला स्वतःला सोसावा लागणार आहे, तसे सोबतच्या प्रतिज्ञापत्राप्रमाणे रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर स्वसाक्षांकित करुन घ्यावे.(प्रपत्र-१)

3) विदेश अभ्यास दौऱ्यादरम्यान सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान व मद्यपान करण्यास सक्त मनाई आहे. विदेश अभ्यास दौऱ्यादरम्यान वैयक्तीक वागणुकीमुळेकृषि विभाग किंवा देशाच्या अभिमानास तडा जाईल असे कोणतेही वर्तन होणार नाही, दौऱ्यादरम्यान मद्यप्राशन करुन इतरांना त्रास होईल असे वागणे,दौऱ्याच्या कार्यक्रमादरम्यान दौऱ्याच्या निश्चित वेळेचे पालन न करणे, नियोजीत केलेल्या स्थळ/भेटी इत्यादी कार्यक्रमांना भेटी न देणे,परदेशातील सार्वजनिक ठिकाण व भेटींच्या ठिकाणांच्या नियमांचे पालन न करणे इ. केल्याचे आढळल्यास संबंधीत देशाच्या नियमानुसार जो दंड आकारला जाईल तो त्या देशाच्या चलनाच्या स्वरुपात दंड म्हणून स्वतः शेतकऱ्याला भरावा लागेल.

4) प्रवास कालावधीत कोणत्याही स्वरुपाचा अपघात किंवा दुखापत झाल्यास याची जबाबदारी शेतकऱ्याची राहील. याबाबतचे हमीपत्र प्रपत्र-२ मध्ये शेतकऱ्यांकडून स्वसाक्षांकित करुन घेऊन मुळ अर्जासोबत जोडावे.

5) अभ्यास दौऱ्याबरोबर गेलेल्या प्रत्येक शेतकऱ्याने अभ्यास दौऱ्याबरोबरच परत यावयाचे आहे. कोणत्याही परिस्थितीत एकाही शेतकऱ्यास अभ्यास दौऱ्यांच्या मंजूर कालावधीनंतर परदेशात कोणत्याही कारणास्तव

www.mahaagri.gov.in

वास्तव्य करता येणार नाही. याबाबतचे हमीपत्र प्रपत्र-३ मध्ये शेतकऱ्यांकडून स्वसाक्षांकित करुन घेऊन मुळ अर्जा सोबत जोडावे. जर एखाद्या शेतकऱ्याने या नियमांचे उल्लंघन केले तर त्याला कृषि विभाग जबाबदार राहणार नाही. त्यासंबंधी परदेशातील नियमांनुसार योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार संबंधीत देशाच्या प्रशासनास राहतील. त्याबाबत कृषि विभाग कोणत्याही प्रकारची जबाबदारी स्विकारणार नाही.

6) सदर दौरा हा कृषि विभागाने मान्य केलेल्या कार्यक्रमाप्रमाणे राहील. त्यामध्ये शेतकऱ्यांना स्वतः कोणत्याही वेगळ्या भेटींचा समावेश करता येणार नाही. तसेच ठरलेल्या कार्यक्रमापेक्षा स्वतःच्या निर्णयाने परस्परित्या दौऱ्याचा गट सोडून भेटी देता येणार नाहीत.

7) शेतकऱ्याने दौरा पूर्ण झाल्यानंतर तयार करण्यात आलेल्या विहीत प्रपत्रात (प्रपत्र-४) दौऱ्याबाबतचे सविस्तर अभिप्राय देणे आवश्यक आहे. अभ्यास दौऱ्याच्यावेळी आत्मसात केलेल्या ज्ञानाचा उपयोग आपल्या शेतावर/ परिसरामध्ये कशाप्रकारे करणार आहात, याबाबत विहीत प्रपत्रामध्ये माहिती भरुन देणे आवश्यक आहे.

8) सदर दौरा हा शेतकरी अभ्यास दौरा असल्याने प्रवासामधील ज्या ठिकाणांना भेटी द्यावयाच्या आहेत त्याची पूर्व कल्पना, परदेशामध्ये पाळावयाची बंधने, पूर्व तयारी, हवामानानुसार पेहराव, सोबत जड सामानांची वजन मर्यादा, इलेक्ट्रॉनिक वस्तू नेण्याबाबतची मान्यता, चलन उपलब्धता वगैरे माहिती शेतकऱ्यांना मराठीमध्ये लेखी स्वरुपात दौरा सुरु होण्याआधी पुरेशा कालावधीमध्ये संबंधित कंपनीकडून देण्यात येईल. त्यानुसार त्या सुचनांचे काटेकोर पालन संबंधीत शेतकऱ्यास करणे बंधनकारक राहील.

9) दौरा सुरु झाल्यानंतर परदेशातील आपले संपर्कासाठी असलेला, भ्रमणध्वनी क्रमांक या कार्यालयास आणि दौऱ्यासोबतचे अधिकारी यांना लेखी देणे बंधनकारक राहील. तसेच आपल्या कुटूंबातील जवळच्या दोन व्यक्तींचे संपर्क क्रमांकसुध्दा प्रवासी कंपनी तसेच कृषि आयुक्तालयास देणे आवश्यक आहे.

10) दौरा निघण्यापूर्वी अथवा दौरा कालावधीत शासनाने कोणतेही नवीन नियम/अटी लागू केल्यास त्या पाळणे शेतकऱ्यांवर बंधनकारक राहील.

11) या योजनेध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना वरील अटी व शर्तीची जाणीव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/तालुका कृषि अधिकारी यांनी करुन द्यावी. विहीत नमुन्यातील अर्ज व आवश्यक सर्व प्रपत्रासह माहिती सादर करावी.

www.mahaagri.gov.in

दौऱ्याच्या भेटीच्या ठिकाणांचा तपशील दौरा निघण्यापुर्वीच शेतकऱ्यांना देण्यात येत असल्यामुळे त्या त्या ठिकाणांची तांत्रिक व इतर माहिती इंटरनेटच्या माध्यामातून शेतकऱ्यांनी स्वतःजवळ संकलीत करुन घ्यावी.

**शेतकरी निवडीची कार्यपध्दती -**

राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेरील अभ्यास दौरे या योजनेतील शेतकऱ्याची निवड करीत असताना सोबत सहपत्रित करण्यात आलेल्या अर्जाप्रमाणे माहिती भरुन संबंधीत तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करावा. तालुका स्तरावर प्राप्त झालेले अर्ज संकलीत करुन उपविभागीय कृषि अधिकारी यांच्याकडे पाठवावीत व त्यांनी प्राप्त अर्जांची तपासणी करुन त्यांच्या शिफारशीसह जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे पाठवावेत. जिल्हा, तसेच राज्य स्तरावरुन शेतकऱ्यांची निवड करण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या विविध समित्यांनी उपरोक्त बाबी तपासाव्यात व त्यानुसार शेतकऱ्याची निवड अंतिम करण्यात यावी. यासाठी विविध स्तरावर समित्यांचे गठन करण्यात येत असून पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**जिल्हास्तरीय समिती-** शेतकऱ्याचा विहीत नमुन्यात अर्ज प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावाची छाननी करुन शिफारस करण्यासाठी पुढीलप्रमाणे जिल्हास्तरीय समितीचे गठन करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १) विभागीय कृषि सहसंचालक (संबंधीत विभाग) | - अध्यक्ष |
| २) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | - सदस्य |
| ३) प्रकल्प संचालक, आत्मा | - सदस्य |
| ४) विभागीय कृषि पणन व्यवस्थापक (संबंधी विभाग) | - सदस्य |
| ५) कृषि विस्तार विद्यावेत्ता | - सदस्य |
| ६) जिअकृअ कार्यालयातील कृषि उपसंचालक | - सदस्य सचिव |

**जिल्हास्तरीय समितीची कार्यकक्षा -**

1) जिल्हा स्तरावरील शिफारस समितीने शेतकऱ्यांच्या अर्जाची मार्गदर्शक सूचनांमधील अटी/शर्तीनुसार तपासणी करावी व शेतकऱ्यांच्या मागणीनुसार विषय/देशनिहाय प्राधान्यक्रमानुसार यादी तयार करुन सभेच्या इतिवृत्तासह राज्यस्तरीय समितीकडे शिफारस करावी.
2) जे शेतकरी ठरवून दिलेल्या अटींची पूर्तता करतील अशाच शेतकऱ्यांच्या अर्जाचा शिफारशीसाठी विचार करण्यात यावा.
3) राज्यातील शासकीय/निमशासकीय पुरस्कारप्राप्त, प्रगतशिल शेतकरी, महिला शेतकरी, अनुसूचित जाती/जमाती शेतकरी यांना प्राधान्य देण्यात यावे.

www.mahaagri.gov.in

4) शासकीय अनुदानातून यापुर्वी परदेश अभ्यास दौरा केला असल्यास पुन्हा निवड करण्यासाठी शिफारस करण्यात येऊ नये.

5) जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील शेतकऱ्यांना समान संधी मिळेल याबाबत आवश्यक ती दक्षता घ्यावी.

6) दौरा पूर्ण झाल्यानंतर दौऱ्यावर जाऊन आलेल्या शेतकऱ्यांची सविस्तर पत्त्यासह यादी तयार करावी. तसेच शेतकऱ्यांचे अभिप्राय जतन करुन ठेवावेत. यापैकी योग्य शेतकऱ्याचा संसाधन व्यक्ती म्हणून प्रशिक्षणासाठी, शेतीशास्त्रासाठी उपयोग करावा. अभ्यास दौरा केलेल्या शेतकऱ्याने त्याच्या शेतीमध्ये कोणता सकारात्मक बदल केला त्याचे मुल्यमापन करुन तसे आयुक्तालयास कळवावे.

जिल्हास्तरीय समितीची सभा महिन्यातून किमान एक वेळेस अथवा आवश्यकतेनुसार घेण्यात यावी. जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांची अंतिम निवड होऊन ते परदेश अभ्यास दौऱ्यास जाऊन आले असतील अशा शेतकऱ्यांनी कोणते नवीन तंत्रज्ञान अवगत केले अथवा परिसरातील इतर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले याबाबतचा अहवाल आयुक्तालयास पाठवावा. तसेच अशा शेतकऱ्यांचा आत्मा किंवा कृषि विस्ताराच्या तत्सम योजनांमध्ये सहभाग वाढवावा. तसेच या शेतकऱ्यांना शेतकरी मासिक व पणनमित्रचे वर्गणीदार करुन घ्यावे.

**राज्यस्तरीय समिती -**

जिल्हा स्तरावरील समितीने शिफारस केलेल्या शेतकऱ्यांच्या अर्जांची तपासणी केल्यानंतर शेतकऱ्यांना विदेश दौऱ्यावर पाठविण्याचा अंतिम निर्णय मा.आयुक्त, कृषि यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समिती घेईल. सदर समितीची बैठक वेळोवेळी आवश्यकतेनुसार किंवा महिन्यातून किमान एकवेळा होणे आवश्यक आहे. समितीची रचना पुढीलप्रमाणे-

| | |
|---|---|
| १) आयुक्त (कृषि) | - अध्यक्ष |
| २) कृषि संचालक (सर्व) | - सदस्य |
| ३) संचालक (पणन ) | - सदस्य |
| ४) कृषि सहसंचालक (वि.प्र.२) | - सदस्य सचिव |

**राज्यस्तरीय समितीची कार्यकक्षा -**

1. राज्यातील सर्व जिल्हा समित्यांमार्फत आलेल्या प्रस्तावांच्या योग्यतेची छाननी आयुक्तालयातील राज्यस्तरीय समितीने करावी व विविध दौरा कार्यक्रमनिहाय शेतकऱ्यांची अंतिम निवड करावी.

www.mahaagri.gov.in

2. प्रत्येक दौऱ्यामध्ये सर्व विभागांना समान संधी मिळेल, याची समितीने दक्षता घ्यावी.
3. प्रत्येक दौऱ्यासाठी समितीने अधिकाऱ्यांसह ५० शेतकऱ्यांची यादी निश्चित करुन त्यास मान्यता देण्यात यावी.
4. एका सहलीमध्ये कमाल ५० शेतकऱ्यांचीच निवड करावी. परदेशामध्ये ५० पेक्षा जास्त गटाचे व्यवस्थापन करण्यास अडचणी येत असल्याचे दिसून आल्याने यापुढे कोणत्याही दौऱ्यात शेतकरी/अधिकारी यांची संख्या ५० पेक्षा जास्त नसावी.
5. परदेशातील कृषि हवामान परिस्थितीचे वेळापत्रक आणि योजनेतील विविध स्तरावरील निर्णयांचे वेळापत्रक यांचा ताळमेळ राखून सदर योजना यशस्वीपणे राबविण्यात यावी.

समितीने अभ्यास दौऱ्यास पाठवावयाच्या अधिकाऱ्यांच्या निवडीची शिफारस शासनास करावी.

**अधिकारी निवडीचे निकष -**

1) शासन निर्णयानुसार (दिनांक १८ जुलै, २०१२) प्रत्येक दौऱ्यासोबत तीन अधिकारी पाठविण्यात येतील. यामध्ये कृषि व संलग्न विभागाचा एक अधिकारी, पणन विभागातील एक अधिकारी, कृषि विद्यापीठांमधील एक शास्त्रज्ञ यांचा समावेश करण्यात येईल. तथापी कृषि आयुक्तालयामार्फत संबंधीत अधिकाऱ्यांना पाठविण्याबाबतची अंतिम शिफारस शासनास करण्यात येईल. सदर मान्यतेनुसार संबंधीत अधिकाऱ्यांच्या दौऱ्याचा पूर्ण खर्च शासनामार्फत करण्यात येणार आहे. अशा अधिकाऱ्यांची निवड करण्याकरीता खालील निकषांची पूर्तता करण्यात यावी.
2) वैध पारपत्र धारक असावा.
3) शासकीय सेवेत किमान १० वर्ष राजपत्रित पदावर काम केल्याचा अनुभव असावा.
4) अधिकाऱ्यांच्याबाबत कोणतीही विभागीय चौकशी सुरु नसल्याचे स्वसाक्षांकित करावे व तशी खात्री कार्यालय प्रमुखांनी करुन प्रमाणित करण्यात यावे.
5) यापुर्वी शासकीय खर्चाने परदेश अभ्यास दौरा केला नसल्याची खात्री करुन घ्यावी व त्यास कार्यालय प्रमुखाने प्रमाणित करावे.
6) शासकीय सेवेमध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम, स्थानिक कृषि विषयक प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार/उपक्रम राबविणाऱ्या अधिकाऱ्यांना प्राधान्य देण्यात यावे.

सोबतच्या प्रपत्रामध्ये जोडलेल्या वैयक्तीक माहितीच्या नमुन्यातील विविध बाबींची पूर्तता करण्यात यावी.

**अधिकाऱ्यांची जबाबदारी -**

अभ्यास दौऱ्यासोबत ज्या अधिकाऱ्याची निवड करण्यात येते अशा अधिकाऱ्यांवर शासनाचे प्रतिनिधीत्व तसेच दौरा कार्यक्रमाचे नियंत्रण करण्याची जबाबदारी देण्यात येत आहे. अशा अधिकाऱ्यांनी

www.mahaagri.gov.in

दौऱ्याच्या गटाचे नेतृत्व करुन दौरा पूर्ण होईपर्यंत दौऱ्याचे संपूर्ण व्यवस्थापन व समन्वय राखणे आवश्यक आहे. तसेच प्रवासी कंपनीच्या दौरा व्यवस्थापकाच्या सहकार्याने तांत्रिक स्थळभेटीच्यावेळी गटाला आवश्यक ती माहिती देण्याची तसेच दौरा यशस्वीरित्या पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत अधिकाऱ्यांची राहील. दौरा पूर्ण झाल्यानंतर निवडलेल्या अधिकाऱ्यांनी तांत्रिक भेटींच्या फोटो व माहितीसह संपूर्ण अहवाल एका आठवड्याच्या आत सॉफ्ट व हार्ड कॉपीसह सादर करणे आवश्यक आहे.अधिकाऱ्यांना स्वतःच्या राज्यातील कृषि विषयक विस्तृत माहिती असावी. निवड झालेल्या अधिकाऱ्यांनी ज्या देशात भेटी द्यावयाच्या आहेत तेथिल कृषि हवामान, भौगोलिक, राजकिय व ऐतिहासिक माहिती इंटरनेटव्दारे उपलब्ध करुन 'ावी.

दौऱ्यादरम्यान कोणत्याही प्रकारचे वाद अथवा कारवाई संदर्भात घटना घडल्यास शासकीय अधिकाऱ्यांनी समन्वय व प्रसंगावधान राखून सदर प्रश्न निकाली काढावा व याबाबत कृषि आयुक्तालयास त्वरीत अवगत करावे. याकरीता आवश्यकतेनुसार लेखी जबाब घ्यावेत व त्यावर दोन साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या घ्याव्यात. दौऱ्यात सहभागी झालेल्या शेतकऱ्याकडून दौऱ्यादरम्यान कोणतीही मोडतोड झाली नसल्याची खात्री करुन तसे सोबतचे प्रमाणपत्रानुसार प्रमाणपत्र संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व शेतकऱ्यास देण्यात यावे.

दौऱ्यामध्ये सहभागी झालेल्या अधिकाऱ्यांनी दौरा पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांकडून विहीत प्रपत्रामध्ये त्यांचे अभिप्राय तसेच दौऱ्यानंतर आपल्या शेतीमध्ये आणि परिसरातील शेतीमध्ये करावयाचे प्रयोग/बदल याबाबतचा आराखडा प्राप्त करावा व जिल्हानिहाय त्याचे संकलन करुन संबंधीत जिल्ह्याकडे तसेच कृषि आयुक्तालयाकडे प्रत सादर करावी. त्याचप्रमाणे अभिप्रायामध्ये नमूद केल्यानुसार शेतकऱ्याला नवीन प्रयोग करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात यावे व त्याचा पाठपुरावा करुन अभिप्रायासह निष्कर्ष कृषि आयुक्तालयास सादर करावे.

**प्रवासी कंपन्यांची जबाबदारी -**

शेतकऱ्यांचे देशाबाहेरील अभ्यास दौरे आयोजित करण्यासाठी निविदा पध्दतीचा अवलंब करुन आयुक्तालय स्तरावर प्रवासी कंपन्यांची निवड करण्यात येईल. निवड झालेल्या दौरा कंपनीने रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत करारनामा करणे बंधनकारक आहे. प्रत्येक दौऱ्यासाठी जास्तीत जास्त दोन देशामधील भेटींच्या स्थळांचा कार्यक्रम निश्चित करण्यात येईल. सदर ठिकाणांची निश्चिती करताना प्रवासी कंपन्यांच्या प्रतिनिधींनी त्या त्या देशातील कृषि विषयक तज्ञांकडून माहिती सादर करावी. त्यावर कृषि विभागाने तपासणी करुन दिवसनिहाय कार्यक्रमाची आखणी करावी. सदर स्थळभेटीच्या तपशीलास राज्यस्तरीय समितीमार्फत अंतिम मान्यता देऊन दौरा कार्यक्रम निश्चित करण्यात येईल. सदर दौरा जास्तीत

www.mahaagri.gov.in

जास्त ७ ते १० दिवसांचा असेल. दौऱ्याकरीता चीन, इस्त्राईल, नेदरलँड, द्विपक्षीय करार झालेले देश, जागतिक बँकेच्या अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांमध्ये समाविष्ट असलेले देश इ. चा समावेश करण्यात येईल. निवड झालेल्या प्रवासी कंपन्यांना कृषि विभागाने शेतकरी निवड व त्यांच्याकडून घ्यावयाच्या बुकींगबाबत वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

1) निविदा प्रक्रियेमध्ये अंतिम निवड झालेल्या प्रवासी कंपनीने दिलेल्या निविदा सुचनेनुसार दौऱ्याचा तपशील जोडणे आवश्यक आहे. आवश्यकतेनुसार बदल सुचवायचा झाल्यास त्याची मान्यता घेणे बंधनकारक राहील. दौरा कार्यक्रम निश्चित झाल्यानंतर शेतकऱ्यांचे विहीत कागदपत्राची पूर्तता करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी प्रवासी कंपनीची राहील.
2) राज्यस्तरीय समितीने अंतिम निवड झालेल्या शेतकऱ्यांची एका दौरा कार्यक्रमाकरीता ५५ नावांची यादी कंपनीकडे पाठविण्यात येईल. कंपनीने एक आठवड्याच्या कालावधीत त्यांच्याशी संपर्क साधुन दौऱ्यास जाण्याकरीता होकार दिलेले, नकार दिलेले आणि निर्णय प्रलंबीत ठेवलेले याप्रमाणे वर्गीकरण करुन आयुक्तालयास कळवावे. आवश्यकतेनुसार अधिकच्या नावांच्या यादीची मागणी आयुक्तालयाकडे करावी. एकदा दिलेल्या यादीतील सर्व शेतकऱ्यांबद्दल निश्चित निर्णय झाल्यानंतरच कंपनीस पुढील यादी देण्यात येईल. होकार दिलेल्या शेतकऱ्यांकडून आवश्यक ती कागदपत्रे कंपनीने जमा करावी.(उदा.मूळ पारपत्र इ.)
3) ज्या शेतकऱ्यांकडून दौऱ्यामध्ये सहभागी होण्याकरीता होकार मिळेल अशा शेतकऱ्यांना नियोजित स्थळ-भेटी कार्यक्रमाचा तपशील, विमान प्रवासाबाबतचा तपशील, निवास व भोजन व्यवस्थेबाबतचा तपशील, पुणे येथून विमानतळापर्यंत असणाऱ्या प्रवास सुविधेचा तपशील, कृषि विभागाच्या लेखी मान्यतेचे पत्र, यापुर्वी शासकीय अनुदानाने देशाबाहेर दौरा केला नसल्याबाबतचे प्रमाणपत्र इ.बाबींची पूर्तता केल्यानंतर शेतकऱ्याच्या हिश्श्याची ५० टक्के रक्कम घेण्यात यावी.
4) एका अभ्यास दौऱ्यामध्ये जास्तीत जास्त ४५ शेतकऱ्यांचा गट तयार करुन, शेतकऱ्यांची यादी व व्हिसा कार्यालयास पाठवावयाचे पत्र आयुक्तालयास पाठविण्यात यावे. कोणत्याही दौऱ्यास शेतकऱ्याचे नाव प्रस्तावीत करताना त्याने यापुर्वी देशाबाहेरील अभ्यास दौऱ्यासाठी कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेतला नसल्याबाबत कंपनीने प्रमाणीत करुनच शेतकऱ्यांची निवड यादी व्हीसा प्रक्रियेसाठी सादर करावी. यादीव्यतिरिक्त कोणत्याही वैयक्तीक अथवा इतर कारणांकरीता अधिकच्या नावांची व्हीसा मंजूरीसाठी शिफारस करण्यात येऊ नये व अशा प्रकारे यादी व्यतिरिक्त कोणीही जादाची व्यक्ती गटासोबत दौऱ्यास नेण्यात येऊ नये.

www.mahaagri.gov.in

5) दौऱ्याचा दिनांक/अंतर/वेळनिहाय तपशील, निवास, भोजनाचा तपशील, शेतकऱ्यांची प्रमाणीत यादी, पारपत्र व व्हीसाच्या प्रतींसह सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर शासकीय अनुदानाचा धनादेश कंपनीस देण्यात येईल.

6) प्रत्येक अभ्यास दौऱ्याकरीता अनुभवी दौरा व्यवस्थापक असावा. परदेशी भाषा विशेषतः इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असलेला, ज्या देशांमध्ये दौरा आयोजित करावयाचा त्या देशातील ऐतिहासीक, भौगोलीक, राजकीय, वैज्ञानिक बाबींची उत्तम माहिती असलेला, कार्यतत्पर, सहकार्याची भावना असणारा असावा. अशा निश्चित केलेल्या दौरा मॅनेजरचे नाव व संपर्क क्रमांक शेतकऱ्यांकडून बुकींगची रक्कम स्विकारतानाच देण्यात यावा.

7) पुणे येथून विमानतळापर्यंत तसेच परदेशात पोहोचल्यानंतर तेथील स्थानिक स्थळभेटीच्या प्रवासाकरीता सुस्थितीतील वातानुकूलीत बसची सुविधा उपलब्ध करुन दौरा पुर्ण करावा. त्यानंतर वातानुकूलीत बसनेच पुन्हा पुणेपर्यंत शेतकऱ्यांना आणुन सोडणे कंपनीची जबाबदारी राहील.

8) देशाबाहेरील अभ्यास दौऱ्यादरम्यान त्या त्या देशांमध्ये असलेले हवामानानुसार योग्य ते पोषाख, चलन, दूरध्वनी सेवा, वाहतूक नियम, बंधने, विविध अ'यावत सोई सुविधांचा वापर करण्यासाठी सूचना इ. बाबत किमान एक आठवडापुर्व निवडलेल्या सर्व शेतकऱ्यांना स्लाईड शो च्या माध्यमातून अवगत करावे.

9) अभ्यास दौरा दुय्यम होईल अशी कोणतीही कार्यवाही होणार नाही याची जबाबदारी प्रवासी कंपनीची राहील.

10) प्रवासी कंपनी ज्या देशामध्ये अभ्यास दौरा घेऊन जाणार आहे त्या देशातील स्थानिक भेटीच्या संस्थेचे कंपनीचे दूरध्वनी क्रमांक दौरा मॅनेजरकडे असणे आवश्यक आहे. ही माहिती दौऱ्यासोबत असणाऱ्याअधिकाऱ्यांनासुध्दा देणे बंधनकारक राहील.

11) शेतकऱ्याकडून झालेल्या नुकसानीच्या भरपाईची रक्कम शेतकऱ्याच्या संमतीने प्रवासी कंपनीमार्फत भरली असल्यास दौऱ्यात सहभागी झालेल्या अधिकाऱ्याच्या प्रमाणपत्रानुसार शेतकऱ्याने जमा केलेल्या सुरक्षा ठेव रकमेतून प्रतिपूर्ती जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी करावी.

12) शेतकऱ्यांनी कंपनीबाबत दौरा व्यवस्थापनाकरीता दिलेल्या प्रतिक्रियांपैकी ९० टक्क्यापेक्षा जास्त प्रतिक्रिया वाईट स्वरुपाच्या असल्यास कंपनीला काळ्या यादित टाकण्यात येईल.

13) कृषि विभागाशी झालेल्या करारातील प्रवास, निवास, भोजन, भेटीबाबत ठरलेल्या अटी/शर्तींचे उल्लंघन केल्यास कंपनीला काळ्या यादीत टाकण्यात येईल.

www.mahaagri.gov.in

अभ्यास दौऱ्यातील सर्व शेतकरी/अधिकारी यांना ओळखीची खुण म्हणुन बॅचेस/कॅप/ट्रॅव्हल बॅग/इतर कोणतीही वस्तु देण्यात यावी. जेणेकरुन विविध भेटी दरम्यान गटातील शेतकऱ्यांना ओळखता येईल.

सोबतःविहीत प्रपत्रे.

स्वाक्षरीत/-
कृषि संचालक(विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय,म.रा.पुणे-५

---------------------------------------------------------------------------

जा.क्र.शेमासे/१३-१४/शेविअदौ/मासू/प्र.क्र.०२/विप्र-६
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,
कृषि भवन,शिवाजीनगर,
पुणे-४११ ००५, दिनांक- २४ मे,२०१३

प्रति,

१) विभागीय कृषि सहसंचालक, सर्व यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सर्व यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
३) संबंधित प्रवासी कंपनी .

स्वाक्षरीत/-
कृषि संचालक(विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय,म.रा.पुणे-५

www.mahaagri.gov.in

## विदेश अभ्यास दौऱ्यासंबंधीत शेतकऱ्यांची वैयक्तीक माहिती
## शेतकऱ्यांनी करावयाचा अर्ज

१) शेतकऱ्याचे नाव (पारपत्राप्रमाणे) :-
पूर्ण पत्ता /मोबाईल क्र./दूरध्वनी क्र.
(एस.टी.डी. कोडसह)

२) वय (जन्मतारखेच्या प्रमाणपत्राची झेरॉक्स) :-

३) शिक्षण (प्रमाणपत्रासह-झेरॉक्स) :-

४) शेतकऱ्याचे नावे असलेल्या ७/१२ व ८-अ च्या उताऱ्याची प्रत. :-

५) पारपत्र आहे काय? असल्यास सोबत प्रत जोडावी. (पारपत्र वैध असल्याचे खात्री करावी) :-

६)स्वतःच्या शेतीमधील सध्याची पीक पध्दती, करण्यात येत असलेले विविध प्रयोग इ.बाबत थोडक्यात माहिती. :-

७) कृषि विषयक कामगिरीकरीता शासकीय/निमशासकीय :- अथवा तत्सम पुरस्कारमिळालेअसल्यास पुरस्काराचे नाव व वर्ष.

८) शेतकरी शासकीय / निमशासकीयसंस्थेच्या सेवेत असल्यास कार्यालयाचे नाव व पत्ता. :-

९) कोणत्या देशात जाण्यास तयार आहे व त्याबाबतचे भेटीचे नियोजन. :-

१०) यापुर्वी शासकीय योजनेमधुन स्वतः किंवा कुटूंबातील व्यक्तीने (पती, पत्नी व अविवाहीत मुले) विदेश दौरा केला आहे काय, असल्यास तपशील द्यावा. :-

११) शेतकऱ्याने स्वतःचा विमा तयार केल्याचे कागदपत्र सादर केले आहे काय? :-

१२) आपत्कालिन परीस्थितीमध्ये जवळच्या दोन नातेवाईकांचे संपर्क पत्ते (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक व ईमेल) :-

**स्वाक्षरीः-**

**(नावः )**

www.mahaagri.gov.in

**राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे या योजनेअंतर्गत अभ्यास दौऱ्यास जाऊ इच्छिणाऱ्या अधिकाऱ्यांनी भरावयाचे प्रपत्र**

| अ. क्र. | नाव व पत्ता दूरध्वनी क्रमांक (निवास) | सध्याचे पदनाम, कार्यालय संपर्क क्रमांक (कार्यालय) मोबाईल क्रमांक, ईमेल | विवाहीत/ अविवाहीत | स्त्री/पुरुष | शैक्षणीक आर्हता | पारपत्र क्रमांक व वैध कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

| रुजु दिनांकापासून आतापर्यंत काम केलेली पदे व तपशील | | विभागीय चौकशी यापुर्वी झाली काय, सुरु आहे काय, प्रस्तावीत आहे काय? | आतापर्यन्त राज्य/राष्ट्रीय पातळीवर घेतलेले प्रशिक्षण | यापुर्वी परदेश दौरा/प्रशिक्षण शासकीय खर्चाने केले आहे काय? | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पद | कालावधी | | | देश | विषय | कालावधी | कोणत्या योजनेअंतर्गत |
| ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |

अधिकाऱ्याची स्वाक्षरी, पदनाम व
कार्यालयाचा पूर्ण पत्ता

www.mahaagri.gov.in

**प्रपत्र-१**

**विदेश दौऱ्यावर जाणाऱ्या शेतकऱ्यांकडून घ्यावयाचे**
**हमीपत्र**

मी --------------------------- रा.------------------------ कृषि विभागामार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या देशाबाहेरील अभ्यास दौऱ्याअंतर्गत ------------------------------ या देशांच्या दौऱ्यासाठी माझी निवड करण्यात आलेली आहे.

मी असे लिहून देतो की, सदर दौऱ्यादरम्यान माझ्या वैयक्तीक वागणुकीमुळे माझ्या किंवा माझ्या देशाच्या अभिमानास तडा जाईल असे कोणतेही वर्तन करणार नाही. दौऱ्यादरम्यान दुर्वर्तन (यामध्ये मद्यप्राशन करुन इतरांना त्रास होईल असे वागणे, दौऱ्याच्या निश्चित वेळेचे पालन न करणे, नियोजत केलेल्या स्थळ/भेटीइत्यादी कार्यक्रमांना प्राधान्य न देणे, परदेशातील सार्वजनिक ठिकाण व भेटींच्या ठिकाणांच्या नियमांचे पालन न करणे इ.) केल्याचे आढळल्यास कृषि विभागामार्फत आकारण्यात येणाऱ्या संबंधीत देशाच्या चलनाएवढी रक्कम दंड म्हणून वसूल करण्यास माझी सहमती आहे.

तसेच माझ्या दुवर्तनामुळे परदेशातील एखाद्या देशामार्फत माझ्यावर काही शासकीय कारवाई (यामध्ये व्हीसा रद्द होणे किंवा माझ्या वैयक्तीक विदेश दौऱ्यास बंदी करणे) अथवा दंडात्मक कारवाई झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील. दंड म्हणून होणारा सर्व खर्च मला स्वतःला सोसावा लागणार आहे, याची मला जाणीव आहे.

स्थळ : पुणे (शेतकऱ्याची सही)

दिनांक- / /२०१३ (नाव--------------------------)

www.mahaagri.gov.in

**प्रपत्र-२**

हमीपत्र

मी श्री./श्रीमती.---------------------------------------- लिहून देतो/देते की, प्रवास कालावधीत कोणत्याही स्वरुपाचा अपघात किंवा दुखापत झाल्यास त्याची जबाबदारी कृषि विभागाची राहणार नाही. ती माझी जबाबदारी राहील. अशा कोणत्याही घटनेच्यावेळी दौऱ्यातील इतर सहकाऱ्यांचा भेटीचा कार्यक्रम न चुकता नियमीत चालू राहील याकरीता आवश्यक ते निर्णय घेऊन मी वैयक्तीकरित्या/माझ्या कुटूंबियांच्या मदतीने आवश्यक ती कार्यवाही करेन.

आपला/आपली

( )

-----------------------------------------------------------

**प्रपत्र-३**

हमीपत्र

मी श्री./श्रीमती. ----------------------------------------- लिहून देतो/देते की, मी अभ्यास दौऱ्याच्या मंजूर कालावधीनुसार संबंधीत गटासोबत पुन्हा भारतात परत येईल. अन्यथा नियमानुसार कायदेशीर कारवाईस पात्र राहील. दौरा कार्यक्रमाव्यतिरिक्त इतर कोणत्याही भेटींच्या बाबत मी आग्रह धरणार नाही व विभागाने निश्चित केलेला कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी सर्व ठिकाणी आवश्यकतेनुसार सहभागी होईन.

आपला/आपली

( )

www.mahaagri.gov.in

**प्रपत्र-४**

**राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे**
**अभ्यास दौऱ्याबाबत शेतकऱ्यांचे अभिप्राय**

| | | |
|---|---|---|
| १ | शेतकऱ्याचे पुर्ण नाव व पत्ता, फोन नंबर, ईमेल, भ्रमणध्वनी. | |
| २ | अभ्यास दौरा केलेल्या देशांची नावे | |
| ३ | प्रवासी कंपनीचे नाव | |
| ४ | शेतकऱ्यांचा अभ्यास दौरा करण्यामागील उद्देश | |
| ५ | प्रवासाचा कालावधी | |
| ६ | विमान सेवेचा दर्जा | १) अति उत्कृष्ट २) उत्कृष्ट ३) सर्वसाधारण ४) असमाधानकारक |
| ७ | अभ्यास दौऱ्याच्यावेळी प्रवासी कंपनीकडून निवास्थानाची करण्यात आलेली व्यवस्था. | १) अति उत्कृष्ट २) उत्कृष्ट ३) सर्वसाधारण ४) असमाधानकारक |
| ८ | हॉटेलचा दर्जा | १) २-स्टार २) ३-स्टार ३) ४-स्टार ४) इतर |
| ९ | चहा, नाश्ता, दुपार व सांयकाळच्या जेवणाची सोय उत्तम होती काय? | १) अति उत्कृष्ट २) उत्कृष्ट ३) सर्वसाधारण ४) असमाधानकारक |
| १० | अभ्यास दौऱ्यात कृषि विषयक स्थळे इत्यादींना भेटीचे केलेले नियोजन. | १) अति उत्कृष्ट २) उत्कृष्ट ३) सर्वसाधारण ४) असमाधानकारक |
| ११ | संबंधीत देशात कृषि विषयक स्थळ दर्शनासाठी कंपनीकडून करण्यात आलेली बस व्यवस्था कशी होती? | १) अति उत्कृष्ट २) उत्कृष्ट ३) सर्वसाधारण ४) असमाधानकारक |
| १२ | प्रवासासोबत प्रवासी कंपनीचे व्दिभाषी/कृषि विषयक मार्गदर्शकांचे सहकार्य. | १) अति उत्कृष्ट २) उत्कृष्ट ३) सर्वसाधारण ४) असमाधानकारक |

www.mahaagri.gov.in

| | | |
|---|---|---|
| १३ | प्रवासासोबत असलेल्या कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांनी कृषि विषयक केलेले मार्गदर्शन. | १) अति उत्कृष्ट २) उत्कृष्ट ३) सर्व साधारण ४) असमाधानकारक |
| १४ | एकंदरीत अभ्यास दौऱ्याकरीता शासनाकडून करण्यात आलेलेल्या सोयी सुविधांबाबत स्वंयस्पष्ट अभिप्राय. | |
| १५ | अभ्यास दौऱ्यादरम्यानिमीत्त मिळालेले कृषि विषयक ज्ञान याबाबत थोडक्यात माहिती द्यावी. | |
| १६ | अभ्यास दौऱ्याच्यावेळी आत्मसात केलेल्या ज्ञानाचा उपयोग आपल्या शेतावर आणि आपल्या परिसरामध्ये कशाप्रकारे करणार आहात, याबाबतचा सविस्तर अभिप्राय. | |

टीपः आवश्यकतेनुसार स्वतंत्र पानाचा/पृष्ठाचा वापर करावा.

शेतकऱ्याची सही -

शेतकऱ्याचे नाव -

भ्रमणध्वनी क्रमांक -

www.mahaagri.gov.in